**-: प्रेसनोट :-** **दिनांक :- १४/०८/२०२६**

# वैद्यकिय पदवी व परवाना नसताना अवैध व्यवसाय करणाऱ्या ५ बोगस डॉक्टर यांच्यावर मुंबई गुन्हे शाखेची कारवाई.

-----------------------------------------------------------

बृहन्मुंबई मधील झाकिर हुसेन नगर, देवनार व नौपाडा, बांद्रा पुर्व, मुंबई या परिसरात वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही शाखेची पदवी संपादीत न करता किंवा कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय शिक्षण नसताना नागरीकांवर वैदयकीय उपचार करून त्यांचे आरोग्य धोक्यात टाकून त्यांच्याकडून भरमसाठ फी घेवून सामान्य नागरीकांची फसवणुक करणाऱ्या बोगस डॉक्टरबाबत मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष ६ व कक्ष ८ या कार्यालयास विश्वसनीय माहिती प्राप्त झाली.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने कक्ष ६ व कक्ष ८ कार्यालयतील पोलीस पथक यांनी वैद्यकिय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे सह झाकिर हुसेननगर, देवनार परिसरातील चार क्लिनिक व नौपाडा- बांद्रा पुर्व या परिसरातील एक क्लिनिक मध्ये छापा टाकला असता, तेथे बोगस डॉक्टर नामे १) सगीर अहमद अब्दुल माजिद हाशमी वय ३९ वर्षे (डॉ सगीर क्लिनीक) २) अखिलेश कुमार देवेन्द्र कुमार दुबे वय ४७ वर्षे (गायत्री क्लिनीक) ३) मेहमुद आलम मोहम्मद शरिफ शेख वय ३६ वर्षे (आयेशा क्लिनीक) ४) केशव प्रसाद कुददुर पटेल वय ५६ वर्षे (पटेल क्लिनीक) ५) मोहम्मद आफताब शौकिम खान वय ५६ वर्षे (आफताब खान क्लिनीक) हे रूग्णांची तपासणी करून त्यांचेवर औषधोपचार करताना मिळून आले.

नमुद बोगस डॉक्टरांकडे कोणताही अधिकृत वैद्यकिय परवाना नसताना तसेच महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल मध्ये नोंदणी नसताना डॉक्टर असल्याचे भासवुन बेकायदेशिररित्या विविध आजारावरील रूग्णांवर औषधेपचार करताना मिळुन आले. त्यांच्या ताब्यातुन एकुण रुपये १,१९,३२४/- किमंतीचे वेगवेगळया प्रकारचे इंजेक्शन बॉटल्स, सिरींज, अॅन्टीबायोटिक टॅबलेट्स असे वेगवंगळया प्रकारचे औषधे व वैद्यकिय साहित्य जप्त करण्यात आले. उपरोक्त बोगस डॉक्टरां विरूध्द देवनार पोलीस ठाणे, मुंबई व निर्मल नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हे नोद करण्यात आले.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती सो, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पुर्व) श्री. धर्मपाल बनसोडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पश्चिम) श्री. सदानंद राणे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. भरत घोणे, कक्ष ८ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री गणेश माळी सपोनि नवनाथ काळे, मसपोनि रुपाली चौधरी, सपोनि श्रीकांत काळे, पोउपनि शरद नाणेकर, पोउनि संदिप रहाणे, मपोउपनि माशेरे, पोह.०६०८७६/खेडकर, पोह.९९००५९/डगळे, पोह.०३१००८/ वानखेडे, पोह.०५०५३२/बैलकर, पोहचा ०३१५७०/ढाकणे तसेच कक्ष ८ कार्यालयाचे सपोनि रोहण भगाडे, पोउपनि हेमंत मिर्जे, पोउपनि दिपक दराडे, पोह सोनावणे, पोह अतिगरे यांचे पथकाने पार पाडली आहे.

**--//--**